पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University
सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००
ईमेल : dbee@sus.ac.in संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०
परीक्षा व मूल्यमापन मंडळ Board of Examinations and Evaluation

Ref. No. PAHSUS/EXAM/2023/969

Date : - 8 MAY 2023

परीपत्रक क्र. 18

**संदर्भ** - शिक्षक मान्यता विभाग १ चे पुअहोसोविसो / शिमा - १ / परिपत्रक/२०२३-२४/२१३७ दि. ३१/३/२०२३ रोजीचे पत्र.

सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य, संचालक, शिक्षक, संस्थाप्रमुख व संबंधितांना कळविण्यात येते की, महाविद्यालयाचे संलग्निकरण नुतनीकरण, विद्याशाखावाढ, तुकडीवाढ विषयवाढ, अभ्यासक्रमवाढ इत्यादी व इतर तत्सम संलग्निकरण प्राप्त करणे संदर्भातील प्रस्ताव शासनास विद्यापीठामार्फत सादर करताना, तसेच अध्यापकांच्या स्थानिनिश्चीतचे (CAS) प्रस्ताव, शिक्षक नेमणुकीच्या मान्यतेचा प्रस्ताव, शिक्षक जाहिरात मान्यतेचे प्रस्ताव इत्यादी सादर करताना सदर महाविद्यालयात कार्यरत असलेल्या सर्व अध्यापकांनी शैक्षणिक वर्षामध्ये सुरु असलेल्या तसेच मागील सलग शैक्षणिक पाच वर्षांमध्ये विद्यापीठातील विविध सत्र परीक्षांच्या प्रश्नपत्रिका तयार करणे व उत्तरपत्रिका मुल्यांकन केल्याबाबतचे प्रमाणपत्र आगामी काळात विद्यापीठास सादर करावयाच्या प्रत्येक प्रस्तावासोबत जोडणे अनिवार्य राहील, अन्यथा प्रस्ताव स्विकारला जाणार नाही, अथवा त्यावर कोणतीही प्रशासकीय कार्यवाही होणार नाही असे संलग्नित सर्व महाविद्यालयांना शिक्षक मान्यता विभागामार्फत संदर्भीय परीपत्रकान्वये कळविण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने संलग्नित महाविद्यालयातील प्राध्यापक उत्तरपत्रिका मुल्यमापन केल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळणेबाबतचा प्रस्ताव थेट विद्यापीठाकडे सादर करीत आहेत.

सबब संलग्नित महाविद्यालयातील प्राध्यापकांनी उत्तरपत्रिकेचे मुल्यमापन केले असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळणेबाबतचा प्रस्ताव महाविद्यालयाचे प्राचार्य यांचेमार्फत सादर करावेत तसेच उत्तरपत्रिका मुल्यांकनाचे काम केले असल्याबाबत संबंधित कॅप सेंटरकडून मिळालेली उपस्थिती प्रमाणपत्राची छायांकित स्वसाक्षांकित प्रत अर्जासोबत जोडून आपले प्रस्ताव सविस्तर तपशीलासह (कायम / तात्पुरते शिक्षक नमूद करुन इत्यादी तपशील) परीक्षा विभागातील आवक - जावक विभागाकडे जमा करणे बंधनकारक आहे. कागदपत्रांची पूर्तता नसलेल्या आणि अपूर्ण अर्जांकरीता शिक्षक मान्यता विभाग १ यांचे दि. ३१/३/२०२३ रोजीचे परिपत्रकातील नमूद असलेले विहित प्रमाणपत्र देण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

डॉ. शिवकुमार एस. गणपूर
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रती,**

मा. प्राचार्य / संचालक , सर्व संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ यांना कळविण्यात येते की, सदरचे परीपत्रक आपल्या महाविद्यालयातील सर्व संबंधित शिक्षकांच्या निदर्शनास आणून दयावे.